# ११. आरशातली स्त्री

**■ हिरा बनसोडे (१९३९) :**

सुप्रसिद्ध कवयित्री. फुले-आंबेडकरी साहित्यचळवळीतील पहिल्या पिढीच्या महत्वाच्या कवयित्री. 'अस्मितादर्श', 'निकाय', 'सुगावा', 'युगवाणी', 'समुचित' इत्यादी नियतकालिकांतून सातत्याने काव्यलेखन. आपल्या काव्यलेखनातून आणि काव्यवाचनातून 'आंबेडकरांची विचारधारा' महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यात प्रवाही करण्यात हिरा बनसोडे यांची कविता अग्रणी ठरली. त्यांचे 'पौर्णिमा', 'फिनिक्स' व 'फिर्याद' हे काव्यसंग्रह प्रसिद्ध आहेत. प्रस्थापित समाजव्यवस्थेच्या विरोधात बंड करणारी, व्यवस्थेला जाब विचारून न्याय्यहक्कांची, अधिकारांची भाषा उच्चारणारी कविता त्यांनी मुख्यत: लिहिली. समताधिष्ठित समाजरचनेला जन्म देणारी 'दलित स्त्री' ही त्यांची नायिका आहे, तिचे भावविश्व त्यांच्या कवितेच्या केंद्रस्थानी असल्याने त्यांची कविता सामाजिक वास्तव तसेच सामाजिक-सांस्कृतिक परिवर्तनेही आपल्या कवेत घेते. 'डॉटर्स ऑफ महाराष्ट्र' या ग्रंथात हिरा बनसोडे यांचा समावेश करण्यात आलेला आहे. त्यांच्या कवितांचे गुजराती, इंग्रजी, फ्रेंच भाषांत अनुवाद झालेले आहेत.

स्त्रीच्या आयुष्यातील स्थित्यंतराचा वेध घेताना कवयित्रीने या कवितेत स्त्रीच्या व्यथा शब्दबद्ध केल्या आहेत. सहज आरशात पाहताना जेव्हा गतकाळाच्या स्मृती जाग्या होतात तेव्हा तिच्या लक्षात येते, की 'मी ती हीच का?' आणि मग तिला वाटत राहते किती अंतर्बाह्य बदलले मी! चैतन्यमय बाल्य, तेजस्वी तारुण्य-त्यांमधील स्वप्ने, ध्येय कुठल्याकुठे जाऊन आता कशाचेही काहीच न वाटणारी स्थितप्रज्ञता माझ्यात आली कोठून? पूर्वी हवेहवेसे वाटणारे चांदणे, वाट पाहणारी जाई अशा छोट्याछोट्या गोष्टींतील आनंदाचेही आता संसारात गुरफटून गेल्यानंतर भान नसते. संसारात गांजलेल्या या स्त्रीला शेवटी आठवणीतील 'बालसखी' नव्या उमेदीने जगण्यासाठी कसे प्रेरित करते, हे या कवितेतून समजून घ्यायचे आहे.

सहज आरशात पाहिले नि डोळे भरून आले
आरशातील स्त्रीने मला विचारले, 'तूच ना ग ती!
माझेच रूप ल्यालेली, तरीही मी नसलेली
किती बदललीस ग तू अंतर्बाह्य...!
तुला सांगू तुझ्या अंतरीचे सुंदर पूर्वरंग
ऐक हं...! तू कशी होतीस ते!

पावसाचे तरंग ओंजळीत भरणारी चैतन्यमयी बालिका
अंगणात दिवे लावावेत तसे सर्वच बहर लावणारी तू नवयौवना
स्वप्नांचे पंख लावून आभाळ झुल्यावर झुलणारी तू ध्येयगंधा
नि आज नखशिखांत तू... तू आहेस फक्त स्थितप्रज्ञा राणी!

आरशात भेटलीस तरी बोलत नाहीस ग मन उलगडून
ओठ मात्र असतात पिळवटलेले, खसकन देह तोडलेल्या फुलांसारखे,
इतकी कशी वेढून गेलीस या घनगर्द संसारात
जळतेस मात्र अहोरात्र पारंपरिकतेचे वरदान समजून



अंगणात थांबलेल्या तुझ्या प्रेयस चांदण्याला
दार उघडून आत घेण्याचेही भान नाही ग तुला
बागेतली ती अल्लड जाईही पेंगुळतेय तुझी वाट पाहून पाहून
पण तू, तू मात्र झालीस अस्तित्वहीन प्राण हरवलेली पुतळी

अनेकदा तुला मी अशी पाहते की काळीजच हंबरते
रात्रीच्या एकांतात तर हुंदका कंठात दाबून
शिवत असतेस तुझे ठिकठिकाणी फाटलेले हृदय

नि पदराखाली झाकतेस देहामधल्या असह्य कळा'
तिचे हे बोलणे ऐकताच मी स्वत:च हिंदकळतेय
आणि अशातच, ती मला गोंजारीत, जवळ घेत
अधिकारवाणीने म्हणाली–

'रडू नकोस खुळे, उठ! आणि डोळ्यातले हे आसू
सोडून दे शेजारच्या तळ्यात
नि घेऊन ये हातात
नुकतीच उमललेली शुभ्र कमळाची प्रसन्न फुले'

(फिनिक्स)



## कृती

**(१) (अ) कृती करा.**

(१) आरशातील स्त्रीने आरशाबाहेरील स्त्रीच्या पूर्वीच्या स्थितीचे केलेले वर्णन
→
→
→

(२) आरशातील स्त्रीने आरशाबाहेरच्या स्त्रीला अधिकारवाणीने केलेला उपदेश
→
→

**(आ) खालील शब्दसमूहांचा तुम्हांला कळलेला अर्थ लिहा.**

(१) घनगर्द संसार– ........................................

(२) प्रेयस चांदणे– ........................................

(३) प्राण हरवलेली पुतळी– ........................................

(४) फाटलेले हृदय– ........................................

**(२) (अ) वर्णन करा.**

(१) आरशातील स्त्रीला आरशाबाहेरील स्त्रीमधील जाणवलेले बदल–

(२) आरशातील स्त्रीने आरशाबाहेरील स्त्रीची काढलेली समजूत–

**(आ) खालील अर्थाच्या कवितेतील ओळी शोधून लिहा.**

(१) बालपणातील तुझा उत्साह आणि तुझ्यातील चैतन्य अवर्णनीय होते. तारुण्यात नवउमेदीने भरलेली, सर्वत्र सहज संचारणारी अशी तू होतीस.

(२) आता मात्र तू स्वत:च स्वत:ला संसारात इतकं गुंतवून घेतलं आहेस, की पारंपरिकपणे जगण्याच्या अट्टहासात तू दिवसरात्र कष्ट सोसत आहेस.

**(इ) जोड्या जुळवा.**

| 'अ' गट | 'ब' गट |
|---|---|
| (१) अंतरीचे सुंदर पूर्वरंग | (अ) मनात असलेले प्रचंड दु:ख लपवून ठेवतेस |
| (२) आभाळ झुल्यावर झुलणारी | (आ) परंपरेने चालत आलेल्या रीतींना वरदान समजून वागणारी. |
| (३) देह तोडलेले फूल | (इ) उच्च ध्येय बाळगण्याचे स्वप्न रंगवणारी |
| (४) पारंपरिकतेचे वरदान | (ई) कोमेजलेले किंवा ताजेपणा गेलेले फूल |
| (५) पदराखाली झाकतेस देहामधल्या असह्य कळा | (उ) मनातले सुंदर भाव |

**(३) खालील ओळींचा अर्थ लिहा.**

(अ) माझेच रूप ल्यालेली, तरीही मी नसलेली
किती बदललीस ग तू अंतर्बाह्य!

(आ) स्वप्नांचे पंख लावून आभाळ झुल्यावर झुलणारी तू ध्येयगंधा
नि आज नखशिखांत तू... तू आहेस फक्त स्थितप्रज्ञा राणी!

**(४) काव्यसौंदर्य.**

अंगणात थांबलेल्या तुझ्या प्रेयस चांदण्याला
दार उघडून आत घेण्याचेही भान नाही ग तुला
बागेतली ती अल्लड जाईही पेंगुळतेय तुझी वाट पाहून पाहून
पण तू, तू मात्र झालीस अस्तित्वहीन प्राण हरवलेली पुतळी,

या ओळींतून सूचित होणारा अर्थ उलगडून दाखवा.

**(५) रसग्रहण.**

**प्रस्तुत कवितेतील खालील पद्यपंक्तींचे रसग्रहण करा.**

तिचे हे बोलणे ऐकताच मी स्वत:च हिंदकळतेय
आणि अशातच, ती मला गोंजारीत, जवळ घेत

अधिकारवाणीने म्हणाली–
'रडू नकोस खुळे, उठ! आणि डोळ्यातले हे आसू
सोडून दे शेजारच्या तळ्यात
नि घेऊन ये हातात
नुकतीच उमललेली शुभ्र कमळाची प्रसन्न फुले'

**(६) अभिव्यक्ती.**

'आरशातील स्त्रीने आरशाबाहेरील स्त्रीशी केलेला संवाद हा स्वत:शीच केलेला सार्थ संवाद आहे', हे विधान स्पष्ट करा.

**उपक्रम :**

'स्त्री'विषयक पाच कवितांचे संकलन करा. त्यांचे वर्गात लयीत वाचन करा.

- **तोंडी परीक्षा.**
  **'आरशातली स्त्री' या कवितेचे प्रकट वाचन करा.**